# रावेर पंचायत समितीला आयएसओ मानांकन

## गटविकास अधिकारी विनोद मेढे यांचा स्तुत्य उपक्रम

**रावेर । प्रतिनिधी**

रावेर पंचायत समितीला नुकतेच आयएसओ मानांकन प्राप्त झाले असून, तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

केवळ दोन महिन्यांपूर्वीच गटविकास अधिकारीपदाचा पदभार स्वीकारलेल्या विनोद मेढे यांनी या काळात पंचायत समितीच्या प्रशासनात सकारात्मक बदल घडवत, अत्यंत गतिमानपणे आयएसओ मानांकनासाठी आवश्यक बाबींची पूर्तता केली.

गटविकास अधिकारी विनोद मेढे यांनी पदभार स्वीकारताच कार्यालयीन शिस्त, दस्ताऐवज व्यवस्थापन, नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा दर्जा आणि वेळेवर निपटारा या सर्वच विभागांमध्ये सुधारणा घडवून आणल्या. विविध विभागांची फायली, त्यांची पूर्तता, सेवांचे दस्तऐवजीकरण या सर्व बाबींवर विशेष लक्ष केंद्रित करत, अवघ्या दोन महिन्यांतच रावेर पंचायत समितीने आयएसओ मानांकन मिळवले. या यशामुळे पंचायत समितीतील कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे व समाधानाचे वातावरण आहे. तसेच, रावेर तालुक्याच्या यशस्वी कारभाराचे हे प्रतीक ठरले आहे. ग्रामविकास विभागाच्या दृष्टीने रावेर पंचायत समिती आता एक 'मॉडेल'ठरू शकते, अशी आशा व्यक्त होत आहे.



# धरणगावात उद्या संगिताचार्य स्व.लक्ष्मीचंद डेडिया संगीतमहोत्सव



**धरणगाव । प्रतिनिधी**

येथील श्री आदिनाथ दिगंबर जैन मंदिर ट्रस्ट व संगीताचार्य शिष्य परिवार यांच्यावतीने स्व.लक्ष्मीकांतजी डेडिया (मास्टरजी) तृतीय संगीत महोत्सव रविवार दि. १० ऑगष्ट रोजी संध्याकाळी ६ ते ९ आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात भक्तीगीत, भावगीत, भजन, शास्त्रीय आणि सुगम संगीतसंध्या कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. याप्रसंगी जेष्ठ संगीतमहर्षी आर. बी. पाटील (धरणगाव), दुष्यंत जोशी (जळगाव), प्रसिद्ध बासरी वादक योगेश पाटील (एरंडोल), व्हॉयोलिन वादळ, भूषण चौधरी (हरिद्वार) हे स्वरांजली सादर करणार आहेत. याचवेळी शहरातील हौसी कलावंत आपली कला सादर करणार आहेत. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान धरणगाव नपाचे मुख्याधिकारी रामनिवास झंवर भुषविणार असून उद्घाटन खान्देशातील प्रसिद्ध कवी,लेखक,साहित्यिक प्रा. वा. ना. आंधळे करणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपनिरीक्षक संतोष पवार राहणार आहेत. धरणगावातील श्री आदिनाथ दिगंबर जैन मंदिराच्या सभागृहात संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमाला रसिक श्रोत्यांनी जास्तीत जास्त संख्येने श्रोत्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी व कलावंतांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.




# पाचोरा येथे एकनाथराव खडसेंच्या प्रतिमेस जोडेमारो आंदोलन

**पाचोरा । प्रतिनिधी**

येथील भारतीय जनता पार्टी पाचोरा मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात आ.एकनाथराव खडसे यांच्या भूमिकेचा तीव्र निषेध करण्यात आला. महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी केलेल्या गंभीर खुलास्यानंतरही एकनाथ खडसे यांनी आपल्या जावयाचे समर्थन करत महिलांच्या अस्मितेचा अपमान केला.

महिलांचे लैंगिक शोषण करून अत्याचार करणारा एकनाथ खडसे यांचा जावई डॉ.प्रांजल खेवलकर याच्या या घाणेरड्या कृत्याबद्दल आमदार एकनाथराव खडसे यांनी त्याची पाठराखण केली. त्या निषेधार्य आमदार एकनाथ खडसे यांच्या प्रतिमेस जोडे मारून जाहीर निषेध करण्यात आला. याप्रसंगी मा.जिल्हा सरचिटणीस तथा ज्येष्ठ पदाधिकारी सदाशिव आबा पाटील, शहराध्यक्ष दिपक माने, शहर सरचिटणीस जगदीश पाटील, समाधान पाटील, उपाध्यक्ष सतीश देशमुख, चिटणीस प्रदीप पाटील, उमेश माळी विरेंद्र चौधरी, बबलू मराठे युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष राहुल गायकवाड, युवा मोर्चा शहराध्यक्ष योगेश ठाकूर, युवा मोर्चा शहर सरचिटणीस रोहन मिश्रा प्रदीप चौधरी, सुनील देशमुख,विलास पाटील, वाल्मीक माने, राहुल महाजन, सनी जगताप, कुमार खेडकर वाल्मीक जाधव, विशाल मोरे, हरिष पाटील,विजू सोनवणे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# पातोंडा कृषी मंडळात राष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि पोषण अभियांना अंतर्गत पिक पाहणी

**अमळनेर । प्रतिनिधी**

तालुक्यातील पातोंडा कृषी मंडळात राष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि पोषण अभियान (कडधान्य) प्रकल्प अंतर्गत पीक प्रात्यक्षिकांना भरत झंगळे, कृषी उपसंचाल जळगाव चंद्रकांत ठाकरे तालुका कृषी अधिकारी अमळनेर यांनी भेटी दिल्यात. रुंधाटी येथे मुग पिकाची तर कंडारी खुर्द येथे तूर पिकाची पाहणी त्यांनी यावेळी केली. रुंधाटी येथील तापी माता शेतकरी गटाच्या सदस्या सौ.वैशाली प्रविण पाटील यांच्या शेतात मूग पिकामध्ये आधुनिक तंत्रज्ञानानुसार अवलंब केलेल्या बाबींची आणि मृत सरीची पाहणी त्यांनी केली. या प्लॉटच्या शेजारी असलेल्या राजेंद्र पंढरीनाथ पाटील यांच्या कापूस पिकावर फवारणी करताना नजरचुकीने अत्यल्प प्रमाणात तणनाशकाचा वापर झाल्यामुळे पिकावर अंशतः परिणाम झाल्याची पाहणी केली. तणनाशकाच्या वापरानंतर रिकाम्या डब्यांची तात्काळ विल्हेवाट लावावी याबाबतीत उपस्थित शेतकऱ्यांना सांगितले. त्यानंतर कंडारी खुर्द येथील सुवर्णयुग शेतकरी गटाने पेरणी केलेल्या तूर पिकाची पाहणी केली. तुर पिकाची टोकन पद्धतीने लागवड आणि योग्यवेळी शेंडे खुडणी केल्यास पिकामध्ये पिकाच्या उत्पन्नामध्ये लक्षणीय वाढ होते असे त्यांनी यावेळी उपस्थित गटातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी प्रकल्पांतर्गत वेळोवेळी प्राप्त झालेल्या निविष्ठांच्या अंमलबजावणीची खात्री केली. महा डीबीटी पोर्टलवरील विविध योजनांचा शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घ्यावा असे आवाहन झंगळे यांनी केले. यावेळी सचिन वानखेडकर मंडळ कृषी अधिकारी पातोंडा, प्रविण पाटील आणि योगेश वंजारी उप कृषी अधिकारी तर सहाय्यक कृषी अधिकारी अनिकेत सूर्यवंशी, निलेश पाटील व चेतन चौधरी यांच्यासह शेतकरी गटाचे अध्यक्ष श्री विकास सुरेश पाटील, सदस्य ज्ञानेश्वर रामभाऊ पाटील, सतिलाल रामभाऊ पाटील, सुभाष छगन पाटील, हिलाल माणिक पाटील, योगेश मधुकर पाटील, सागर राजेंद्र पाटील यांच्यासह काही शेतकरी उपस्थित होते.

# जे.टी.महाजन स्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश

**न्हावी, ता.यावल । वार्ताहर**

विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच क्रीड क्षेत्रातही नावलौकिक व्हावा, या ध्येयाने प्रेरित होऊन जे.टी.महाजन सेमी इंग्लिश मीडियम स्कूल मधील विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले. नुकत्याच पार पडलेल्या तालुकास्तरीय कॅरम व बुद्धिबळ स्पर्धांमध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करत विजेतेपद मिळवले असून, जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विजेते विद्यार्थी- कॅरम-१७ वर्षे गट (मुली): अंकिता संजय नेमाडे, मोक्षदा विजय कोल्हे बुद्धिबळ-१४ वर्षे गट (मुले): रुद्राक्ष राहुल चौधरी बुद्धिबळ-१७ वर्षे गट (मुले): देवांशु प्रशांत कपले कॅरम-१७ वर्षे गट (मुले): अक्षय अशोक जगताप, फाल्गुन राहुल चौधरी, अनुकूल अशोक जगताप यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था अध्यक्ष शरद महाजन तसेच सर्व पदाधिकारी व शाळेचे प्राचार्य नंदकिशोर सोनवणे यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत या यशात महत्त्वाचा वाटा उचलणारे क्रीडाशिक्षक दिलीप संगिले यांच्या मार्गदर्शनाचे विशेष कौतुक केले व विजेत्या विद्यार्थ्यांना जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# गुढे सावदे गावाच्या शिवारात बिबट्याचा धुमाकूळ

## पाळीव प्राण्यांवर होताहेत हल्ले, तक्रारींची दखल वनविभाग घेत नसल्याने संताप

**गुढे, ता.भडगाव । वार्ताहर**

येथील होळ महादेव मंदिराजवळील शेतातील गाईचे वासरूवर तसेच याच शिवाराला लागून सावदे गावालगतच्या खळवाळातील ५ बकऱ्यांवर बरोबर सावदे पिंप्रीहाट रस्त्यावरील शेतात बांधलेल्या ३ बकऱ्यांवर बिबट्याने हल्ला करून जागेवरच फडशा पाडला असून याच आठवड्यात सलग एकाच शिवारालगत पाळीव प्राण्यावर हल्लावर हल्ला करून बिबट्याने चांगलाच धुमाकूळ घातला असून शेतकरी व पशुधन मालक भयभीत होऊन धास्तावले आहेत.

याबाबत वनविभागाकडे तक्रार करूनही ते बंदोबस्त बाबत दुर्लक्ष करत यामुळे शेतकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला असून सदर शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी सावदे सोसायटीचे माजी चेअरमन संजय वामन पाटील यांनी व शेतकऱ्यांनी केली आहे या परिसरात बिबट्याचा वावर व मुक्काम असून त्याला जेरबंद करण्यात यावा अशी मागणी होत आहे.

गुढे येथील संजय काशीनाथ कोळी यांचे श्री होळेश्वर महादेव मंदीरालगतच शेती असून या ठिकाणी चार पाळीव जनावरे बांधलेली होती दि.२ रोजी रात्रीच्या सुमारास बिबट्याने शेतात बांधलेल्या गाईच्या ३ वर्षांच्या मोठ्या वासरीवर बिबट्याने हल्ला करून त्याला जागेवरच ठार केले.या ठिकाणी बिबटयाचा पायाचा माग ठसे आहेत सदर शेतकरी अल्प भुधारक बरोबर अतिशय गरीब असून ते सर्व कुटुंब हातमजुरी करून उदरनिर्वाह करतात त्यांचे आज रोजी बाजारभाव प्रमाणे २५ हजार रुपयांचे मोठे नुकसान झाले तसेच दि.६ रोजी रात्री वाल्मिक पुंडलिक पाटील यांच्या ३ बकऱ्या बिबट्याने जागेवरच मारल्याने सदर शेतकऱ्यांचे कमीत कमी ७५ हजार रुपयांचे मोठे नुकसान झाले आहे सावदे येथील शेतकरी इरभान प्रल्हाद पाटील यांच्या खळवाडीत दि.७ रोजी रात्री ५ बकऱ्या जागेवरच मारून सदर शेतकऱ्यांचे १लाखाचे मोठे नुकसान झाले सदर शेतकऱ्यांना पंचनामा केला असून त्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी त्यांनी व परिवाराने केली आहे.परिसरातील अनेक गावांतील शेतशिवारात बिबट्याचा वावर कायम दिसून येत असल्याने शेतकरी चांगलेच धास्तावले आहेत या ठिक ठिकाणी टॅब कॅमेरा,पिंजरा लावण्यात यावी अशी शेतकऱ्यांनी मागणी केली असून याकडे वनविभाग सोयीस्कर दुर्लक्ष करत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे याकडे वरिष्ठ अधिकारी व लोकप्रतिनिधी यांनी लक्ष घालून वारंवार बिबट्याचे हल्लेवर हल्ले होत असून ते थांबवावे अन्यथा एखाद दुसऱ्यांचा जीव जाईल तेव्हाच दखल व उपाय योजना करणार आहात का?असा संताप शेतकऱ्यांनी व्यक्त केलाआहे.



# मोटरसायकल चोरी करणारा चोरटा अमळनेर पोलिसांच्या ताब्यात

**अमळनेर । प्रतिनिधी**

दि.३१ जुलै रोजी दुपारी १३.३० ते १४.०० वाजेच्या दरम्यान अमळनेर शहरातील राजेंद्र रतनलाल वर्मा राहणार प्रताप मिल्क कंपाऊंड अंमळनेर हे दुपारी जेवणासाठी घरी आले असता त्यांनी त्यांची हिरो होंडा स्प्लेंडर प्लस कंपनीची मोटरसायकल क्रमांक MH १९ AF ४२५५ ही हॅण्डल लॉक करून त्यांचे घरासमोर लावली असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली होती त्यावरून अंमळनेर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर तक्रार दाखल झाल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री दत्तात्रय निकम साहेब यांनी अमळनेर पोलीस स्टेशनचे गुन्हे शोधपथकातील पोलीस उपनिरीक्षक नामदेव बोरकर यांच्या नेतृत्वात पोलीस कॉन्स्टेबल अशोक साळुंखे, मिलिंद सोनार, विनोद भोई, पोलीस कॉन्स्टेबल निलेश मोरे, विनोद संनदानशिव, उदय बोरसे अशांना सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेली मोटरसायकल व अज्ञात चोरटा शोधण्याचे आदेश व सूचना दिल्या. पथकातील पोलीस अधिकारी व पोलिस अंमलदार यांनी अमळनेर शहरातील प्रताप मिल कंपाऊंड परिसर व इतर ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे तपासून पाहिले तसेच गुप्त बातमीदार यांच्याकडून मिळालेल्या माहितीवरून विजय भाईदास भील वय १९ वर्षे राहणार एकरुखी तालुका अमळनेर याने सदर मोटरसायकल चोरी केल्याचे निष्पन्न झाल्यावर त्याला एकरूखी तालुका अमळनेर येथून त्याच्या घरून ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. वर नमूद आरोपी याची पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली.

रिमांड मध्ये असताना त्याला सदर चोरीस गेलेल्या मोटरसायकल बाबत विचारपूस केली असता त्याने सदर मोटरसायकल ही चोरी करून डुबकी मारुती मंदिर परिसरातील झाडाझुडपांमध्ये लपवल्याचीकबुली दिली. त्यानंतर सदर मोटरसायकल लपवलेल्या ठिकाणावरून हस्तगत करून जप्त करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल अशोक साळुंखे करीत आहेत. सदर कारवाई माननीय पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती कविता नेतकर, उपविभागीय पोलिस अधिकारी विनायक होते यांच्या मार्गदर्शनात व पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम साहेब यांच्या आदेश व सूचनेनुसार करण्यात आलेली आहे. अमळनेर शहरात व परिसरातून आपली मोटरसायकल व इतर मालमत्ता चोरी जाऊ नये ती सुरक्षित राहावी यासाठी नागरिकांनी सतर्क व सजग राहण्याची सूचना पोलीस निरीक्षक निकम साहेबांनी दिली असून नागरिकांनी सतर्कतेची उपायोजना म्हणून आपले घर, ऑफिस, गोडाऊन व इतर महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे आव्हान केले आहे.

# शाश्वत शेती दिनी शेतकऱ्यांना कापूस मूल्यवर्धनाचे धडे

**पारोळा । प्रतिनिधी**



तालुक्यातील कन्हेरे येथे दि.७ ऑगस्ट रोजी देशाचे हरितक्रांतीचे प्रणेते भारतरत्न डॉ.एम.एस. स्वामीनाथन यांचा जन्मदिवस 'शाश्वत शेती दिन' म्हणून साजरा करण्याचे शासनाने घोषित केले असून पारोळा तालुक्यातील कन्हेरे येथे शेतकऱ्यांच्या शेतावर शाश्वत शेती दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन कृषी विभागामार्फत करण्यात आले होते. यावेळी डॉ.स्वामीनाथन यांचे जीवन कार्य व कृषी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची ओळख शेतकऱ्यांना करून देण्यात आली.

त्यांच्या कृषी क्षेत्रातील योगदान व कार्याची प्रेरणा घेऊन शेतकऱ्यांनी पारंपारिक शेती पद्धतीत बदल करून आधुनिक व पर्यावरण पूर्वक शेती पद्धतीचा अवलंब करून पावसाचा लहरीपणा,अनियमित बाजारभाव, वाढलेला पीक उत्पादन खर्च या बाबींवर मात करून शाश्वत शेती विकासासाठी पीक उत्पादनाची मूल्यसाखळी विकसित करण्याबाबतची माहिती उप कृषी अधिकारी सुरेश लांडगे यांनी दिली. शाश्वत शेती दिनाचे औचित्य साधून कन्हेरे येथे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (टप्पा २) अंतर्गत सुरू असलेल्या कापूस पिकावरील शेतकरी शेती शाळेच्या दुसऱ्या वर्गाचे आयोजन देखील यावेळेस करण्यात आले होते. यामध्ये शेतकऱ्यांनी पीक उत्पादन खर्च कमी करून उत्पादकता वाढीबरोबरच कापूस पिकात मूल्य साखळी विकसित करण्याबाबतचे धडे कृषी विभागामार्फत देण्यात आले. यावेळी परिसरातील मागील पंधरवड्यापासून पडलेल्या पावसाच्या खंडामुळे पिकाच्या नाजूक अवस्थेमध्ये मूलस्थानी जलसंधारण बाबींचे महत्त्व व विविध योजने मार्फत शेतातील ओलावा व शिवारातील पाण्याची पातळी वाढविण्याच्या दृष्टीने कंपार्टमेंट बंडिंग व जलतारा खड्ड्याचे महत्त्व व अनुदान याबाबत सविस्तर माहिती सुरेश लांडगे यांनी यावेळी शेतकऱ्यांना करून दिली. शेतकरी कौतिक सखाराम पाटील यांच्या शेतावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येऊन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार कृषी सेविका ज्योती कळंबे यांनी मानले. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी रोहित शिंदे यांनी कार्यक्रमाचे आयोजन करून कार्यक्रम यशस्वीतेसाठी कृषी सेविका ज्ञानेश्वरी फोपसे, पूजा तरटे,शेतकरी संजय पाटील, समाधान पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.



# 'हरघर तिरंगा' उपक्रमांतर्गत सैनिकांना पाठविल्या राख्या

**मुक्ताईनगर । प्रतिनिधी**

शहरातील जे.ई. स्कूल आणि ज्यु कॉलेज येथे महाराष्ट्र शासन शिक्षण विभाग यांच्यामार्फत राबविण्यात येत असलेल्या हर घर तिरंगा २०२५ या उपक्रमा अंतर्गत तथा दरवर्षी विद्यालयातून राबविला जाणारा राखी अभिमानाची धागा शौर्याचा या कार्यक्रमांतर्गत मुलींनी १८ महाराष्ट्र बटालियन जळगाव येथील सैन्यातील पदाधिकारी तथा सैनिक बांधवांना शुभेच्छा देऊन राख्या पाठविण्यात आल्या.

भारतीय सैनिक तिरंगा ध्वज आणि देश रक्षणासाठी देत असलेल्या योगदानाची माहिती मुलांना व्हावी तसेच आपल्या देशाच्या रक्षणासाठी आणि तिरंगी ध्वजाच्या सन्मानासाठी सदैव तत्पर असणारे आपले भारतीय जवान त्यांचा त्याग आणि बलिदान अनमोल आहेत. विद्यालयातील शंभराहून अधिक विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी होऊन आपल्या सैनिक बांधवांना अशी अनोखी भेट म्हणून पाठविण्यात आली.

उपक्रमाची माहिती श्री एस आर ठाकूर यांनी दिली तर व्ही डी पाटील यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. प्रसंगी प्राचार्य श्री व्ही एम चौधरी उपप्राचार्य, पर्यवेक्षक आणि सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर बंधू भगिनी यांची उपस्थिती होती.

# नवभारत गणेश मंडळाची कार्यकारिणी

**यावल । प्रतिनिधी**



लेवा प्रतिष्ठान आयोजित नवभारत गणेश मंडळ यांची सर्वसाधारण नियोजन प्रगतशील शेतकरी प्रमोद शेठ नेमाडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सभेची सुरुवात ही गणपती बाप्पाच्या आरतीने झाली त्यानंतर प्रस्तावना व त्यानंतर लोगोचे व टी-शर्टचे अनावरण करण्यात आले त्याचबरोबर गतवर्षात मृत झालेल्या समाजातील सर्व लोकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली त्यानंतर मंडळाची नवीन कार्यकारिणी तयार करण्यात आली तर नवभारत गणेश मंडळाच्या २०२५ या वर्षासाठी अध्यक्ष म्हणून किशोर सुधाकर महाजन उपाध्यक्ष म्हणून भोजराज शालिक ढाके सचिव म्हणून मोहन अनिल फेगडे तर खजिनदार म्हणून स्नेहल फिरके यांची बिनविरोध निवड करण्यात आली निवडीनंतर सर्व मान्यवरांनी स्वागत केले व त्यानंतर या वर्षाची सर्व रूपरेषा निश्चित करण्यात आली.



# सौ.हिराबाई जगतराव पाटील विद्यालयात डिंपल पवारचा सत्कार

**जळगाव । प्रतिनिधी**

सौ.हिराबाई जगतराव पाटील माध्यमिक विद्यालय शिरसोली येथे शाळेची माजी विद्यार्थिनी डिंपल शांताराम पवार यांची शासकीय वसतीगृह अधीक्षक म्हणून नाशिक येथे निवड झाली त्याबद्दल तिचा व तिच्या आईचा शाळेचे अध्यक्ष आप्पासाहेब जगतराव बारकु पाटील व शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.कल्पना प्रमोद पाटील यांनी सत्कार केला.

सत्काराला उत्तर देताना तिने जीवनाशी कसा संघर्ष केला. याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले तसेच विद्यार्थ्यांना करिअर विषयी मार्गदर्शन केल. तिच्या मनोगत आतून तिने शाळेबद्दल आणि शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तिच्या या यशामागे शाळेचा मोठा हातभार आहे असे तिने सांगितले. शेतकऱ्याला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# लंपी रोगाचा प्रसार रोखण्यासाठी चाळीसगाव येथे आज भरणारा गुरांचा बाजार बंद

**चाळीसगाव । प्रतिनिधी**

चाळीसगाव बाजार समिती ही उत्तर महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेली बाजार समिती आहे. शनिवारी भरणारा गुरांचा बाजार हा जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांच्या आदेशानुसार लंपी स्किन डिसीज् या आजारामुळे बंद ठेवावा, असे आदेश बाजार समितीस प्राप्त झाल्यामुळे शनिवारी भरणारा गुरांचा बाजार हा पुढील आदेश येईपर्यंत बंद राहणार आहे, अशी माहिती बाजार समितीचे सभापती प्रदीप सुभाष पाटील यांनी दिली.

**काय म्हटले आहे, या आदेशात-** जिल्हयातील सर्व १५ तालुक्यातील ९६ ठिकाणी जनावरां मध्ये लंम्पी स्किनडिसीज या साथ रोगाने बाधीत्त जनावरे आढळून आल्याने तसेच या रोगाचा प्रसार जिल्हयात इतर भागातील निरोगी पशुधनास होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर रोग विषाणुजन्य सांसर्गिक रोग असल्याने या रोगाचा प्रसार होऊ नये म्हणून प्रतिचंधात्मक उपाययोजना तात्काळ अमलात आणणे आवश्यक आहे. त्याअर्थी मी आयुष प्रसाद, भा.प्र.से.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जळगांव प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम २००९ नुसार मला प्राप्त अधिकारानुसार पशुधनातील संम्पी स्किन या रोगाचे प्रतिबंध व निर्मुलन करण्यासाठी खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

१) जनावरांची खरेदी विक्री साठीचे जिल्हयातील गोवर्गीय पशुधनाचे सर्व बाजार पुढील आदेश होईपर्यंत बंद ठेवण्यात यावे. लंम्पी स्किन डीसीण या साथरोगाची लागण मौसवर्ग, शेळी व मेंदी माध्ये होत नसल्याने त्यांचे खरेदी विक्रीचे बाजार नेहमी प्रमाणे सुरु राहतील. २) जळगांव जिल्हयांत गोवर्गीय जनावरांच्या शर्यती, गोवर्गीय प्राण्यांची जत्रा व प्रदर्शन, पुढील आदेश होईपर्यंत बंद ठेवण्यांत यावे. ३) जिल्हयातील इतर राज्यामधुन आंतर जिल्हा व आंतर तालुका गोवर्गीय पशुधनाची होणारी वाहतुक बंद ठेवण्यांत यावी. त्या करिता जिल्हा पोलिस प्रशासन व उपप्रादेशिक परिवहन विभाग यांनी आंतरराज्य सिमेवरील चेकनाक्यावर कसुन तपासणी करावी ज्या गोवर्गीय जनावरांना लंम्यो प्रतिबंधक लसीकरण करून २८ दिवस पूर्ण झालेले आहे. त्यांनी तसे प्रमाणपत्र सादर केल्यास वाहतुकीस परवानगी असेल. ४) जिल्हयातील सर्व तालुक्यात गोवर्गीय एकत्र येतील असे सार्वजनिक चराई व सार्वजनिक गुरांसाठीचे पाणी पिण्याचे सार्वजनिक हौद पुढील १५ दिवस बंद ठेवण्यात यावे. ५) सदर रोगाचा प्रसार बाहय किटकांव्दारे (डास, माशा, गोचिड इ.) होत असल्याने आजारी नसलेल्या सर्व जनावरांवर तसेच गोठ्यात बाहय किटकाच्या निर्मुलनासाठी ग्रामपंचातीने पशुसंवर्धन विभागाच्या सहकार्याने औषधाची फवारणी करावी. ६) ग्रामपंचायतीनी पशुधन मृत झाल्यास शात्रीय पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी ध्याय ८ फुट आकाराचे खडडे करण्याची व्यवस्था करावी सदर व्यवस्था ग्रामपंचायत स्तरावर शक्य नसल्यास गटविकास अधिकारी यांच्या मार्फत बांधकाम विभाग पंचायत संमिती किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून खडढे करण्याची व्यवस्था कराची पशुधन विकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली शाओक्त पध्दतीने मृत पशुधनाची विलेवाट लावावी, ७) सर्व पशुपालकांनी LSD आजाराची माहिती शासकीय पशुवैद्यकिय संस्थेस देणेबंधन कारक आहे. खाजगी पदविकाधारक यांनी LSD चे परस्पर उपचार केल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यांत येईल. ८) जिल्हयांतील सर्व पशुवैद्यकिय संस्थांनी LSD उपचारासाठी भ्रावश्यक सर्व औषधी वरिष्ठांशी चर्चाकरुन उपलब्ध करुन घेण्यात याव्यात.